ePaper
वर्ष - 8 I अंक - 264 | UDYAM-MH-26-0158827

पुन्हा अतिमुसळधार पावसाचा इशारा; 17 राज्यांना आयएमडीचा हायअलर्ट!




**आतील पानांत**

- साई सुदर्शनने रचला इतिहास!
- डेव्हॉन कॉनवे याच्या वडिलांचे निधन
- तुम्ही निवडणूक आयुक्त नव्हता
- पोप फ्रान्सिस यांचं निधन!


महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 22 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 'एक मंदिर, एक विहीर आणि एक स्मशानभूमी' चा नारा

# हिंदुत्व तळागाळात नेण्यासाठी, भागवतांचे अफलातून पाऊल!

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अनाकलनीय भूमिका : आता सर्वधर्मसमभावाच्या दिशेने!

। अलिगढ /नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**ब्राह्मण्यवादाला नेहमी प्राधान्य दिल्याचा आरोप होत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अचानक भूमिका बदलून संपूर्ण हिंदू समाजाला नेमका कोणता संदेश दिला आहे, याचा भल्याभल्यांना उलगडा झालेला नाही. भागवत हे नेहमीच वादग्रस्त वक्तव्यांसाठी प्रसिद्ध आहेत. हिंदुत्व समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचावे, यासाठी भागवतांनी भूमिका घेतलेली दिसते, असा जाणकारांचा अंदाज आहे.**



### हिंदुत्वासाठी जास्त मुले जन्माला घाला...

संघ परिवार म्हणजे मनुस्मृतीचे आचरण करणारा परिवार असे मानले जाते. या परिवाराचे प्रमुख भागवत हे नेहमीच वादग्रस्त वक्तव्ये करतात. हिंदू धर्म टिकवण्यासाठी आणि देशात हिंदुत्ववादी प्रशासन यावे, म्हणून हिंदूंनी जास्त मुले जन्माला घालावीत, असा सल्ला त्यांनी दिला होता. आता, सर्व समाजाला एकत्र घेण्याचा सबुरीचा सल्ला देऊन भागवतांनी नेमके काय साधले आहे, ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### सर्वधर्मसमभावाकडे संघ झुकला?

'एक मंदिर, एक विहीर अन् एक स्मशानभूमी' हा भागवत यांचा आजचा संदेश ऐकून अनेक जण आश्चर्यचकित झाले आहेत. जातीयवाद संपवून ऐक्य निर्माण करण्याचे आवाहन भागवत यांनी स्वयंसेवकांना केले आहे. समाजातील सर्व घटकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न करून देशामध्ये सलोखा टिकवावा आणि शांतता राखावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### समाजातील सर्व घटक

### 'आपलेसे' करा..

भागवत यांनी म्हटले, आहे की संघाच्या स्वयंसेवकांनी समाजातील सर्व घटकांना एकमेकांच्या घरी आमंत्रित केले पाहिजे. 'एक मंदिर, एक विहीर अन् एक स्मशानभूमी'चा भागवत यांचा संदेश हा जातीयवाद संपवून ऐक्य आणि सलोखा निर्माण करण्यासाठीच आहे, हे लक्षात घ्यायला हवे!

### सामाजिक एकता मजबूत करा

उत्तर प्रदेशातील अलिगढमधून जातीय भेदभाव संपवून सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. संघाच्या 'स्वयंसेवकां'ना संबोधित करताना भागवत म्हणाले की, हिंदू समाजाने एक मंदिर, एक विहीर आणि एक स्मशानभूमी या तत्त्वाचा अवलंब करून सामाजिक एकता मजबूत करावी. असे घडल्यास समाज एकसंध होण्यास मदत होईल. स्वयंसेवकांनी गावोगावी जाऊन संघाची भूमिका घराघरात पोहचवावी आणि सर्वांचा संघाबाबतचा असलेला एकांगी दृष्टिकोन बदलून टाकावा.

### नरेंद्र मोदी - भागवत भेटीनंतर संघ बदलला?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरला भेट देऊन संघाचे मुख्यालय असलेल्या 'रेशीमबाग' येथे मोहन भागवत यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली होती. भाजपा आणि संघ यांच्यात काहीतरी कुरबुरी ऐकू येत होत्या. पण, हिंदूंचे हे दोन मोठे नेते हिंदू धर्माचा प्रसार आणि प्रचार समाजाच्या शेवटच्या टोकापर्यंत कसा पोहचेल, याचे समीकरण मांडत असावेत. त्यातूनच संघ परिवाराची ही भूमिका बदलल्याचे स्पष्ट होत आहे. स्वतःला समाजापासून नेहमी अलिप्त ठेवणारा संघ आता समाजात तळागाळापर्यंत पोहचणार असल्याचे संकेत भागवत यांनी दिले आहेत.

# जुनी एक रुपयात पीक विमा योजना बंद!

## निकषात बदल करून नव्याने योजना; अजित पवार यांची माहिती



। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'एक रुपयातील पीक विमा योजना अडचणीत आली आहे. ग्रामीण भाषेत सांगायचे, तर शेतकऱ्यांनी या योजनेला 'चुना' लावला आहे,' असे सांगत एक रुपयात पीक विमा योजना बंद करण्याचे संकेत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. जुन्या पीक विमा योजनेतील निकष बदलून नव्याने ही योजना तयार करून मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यावर निर्णय घेतला जाईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले.**

'दिशा कृषी उत्पन्नाची @ २०२९' या पंचवार्षिक आराखड्याचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सोमवारी झाला. या निमित्ताने व्हॉट्स ॲप चॅनलच्या क्यू आर कोड आणि सेवादूत ॲपचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले. तसेच विविध संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक रफिक नाईकवडी, राज्य शिखर बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, मराठा चेंबरचे महासंचालक प्रशांत गिरबने, बँक ऑफ महाराष्ट्राचे देवदत्त रोकडे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी या वेळी उपस्थित होते.'शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्य शासन कायम उभे असून, महायुती सरकारने पहिल्या दिवसांपासून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नाउमेद न होता आत्मविश्वासाने पुढे जावे,' असा सल्ला देतानाच त्यांनी पीक विमा योजनेतील गैरव्यवहारावरून शेतकऱ्यांचे कान टोचले.'एक रुपयात पीक विमा योजना दिल्यानंतर अनेकांनी योजनेला अडचणीत आणले. ग्रामीण भाषेत सांगायचे झाले, तर या योजनेला 'चुना'च लावला. त्यामुळे याबाबत नव्याने विचार केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांची या संदर्भात बैठक झाली आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांसाठी नव्याने ही योजना आणली जाईल. त्यासाठी जुन्या योजनेत काही बदल करण्यात येतील. हे बदल करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जाईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्या संदर्भात लवकरच निर्णय घेतला जाईल,' असे पवार यांनी स्पष्ट केले.'शेतीला व्यवसायाचा दर्जा देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. त्यासाठी आर्थिक स्वावलंबन साधण्यासाठी धोरण आखले जात आहे. शेतकऱ्यांच्या मनात आत्महत्येची भावना येणार नाही, याची दक्षता घेतली जाईल. शेतीचा पाच वर्षांचा आराखडा करण्यात येत आहे. केवळ लक्ष्यांक आणि आकड्यांवर भर नसून, शेतीची बलस्थाने आणि उणिवा लक्षात घेऊन त्याला वैज्ञानिक आणि व्यावहारिक जोड दिली जाईल. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, हवामान बदलासह बाजारपेठेची साथ मिळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू आहेत.

### स्वावलंबन साधण्यासाठी धोरण

एक रुपयात पीक विमा योजना दिल्यानंतर अनेकांनी योजनेला अडचणीत आणले. ग्रामीण भाषेत सांगायचे झाले, तर या योजनेला 'चुना'च लावला. त्यामुळे याबाबत नव्याने विचार केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांची या संदर्भात बैठक झाली आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांसाठी नव्याने ही योजना आणली जाईल. त्यासाठी जुन्या योजनेत काही बदल करण्यात येतील. हे बदल करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जाईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्या संदर्भात लवकरच निर्णय घेतला जाईल,' असे पवार यांनी स्पष्ट केले.

# 'पीएमपी'त आता वाहकही कंत्राटी

## दोन हजार चालक आणि वाहक कंत्राटी पद्धतीने भरण्यास सहमती



। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर परिवहन महामंडळामधील (पीएमपीएमएल) कंत्राटदारांच्या बससोबत केवळ चालकांची सेवा घेतली जात असताना आता वाहकही कंत्राटी पद्धतीने सेवेत घेतले जाणार आहे. त्यानुसार कंत्राटी पद्धतीने (भाडेतत्त्वावर) ४०० बस सेवेत दाखल करण्यात येणार असताना एक हजार चालकांबरोबर एक हजार वाहकांचीही सेवा घेतली जाणार आहे.**

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील 'जीवनवाहिनी' असलेल्या 'पीएमपी' प्रशासनात अनेक वर्षांपासून अंतर्गत भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. त्यातच 'पीएमपी'च्या ताफ्यात एक हजार ६०० नवीन बस दाखल करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात ६०० बस दाखल करून घेण्याचे नियोजन केले असून भाडेतत्त्वावरील ४००, तर स्वमालकीच्या २०० बसचे नियोजन आहे.त्यापैकी भाडेतत्त्वावरील १४६ बस ताफ्यात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यातच 'पीएमपी'मध्ये मनुष्यबळाची कमतरता असताना प्रशासनाकडून भाडेतत्त्वावरील कंत्राटदारांकडूनच दोन हजार मनुष्यबळ सेवेत दाखल करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे यामध्ये एक हजार वाहकही कंत्राटी पद्धतीने सेवेत घेतले जाणार आहे. यापूर्वी कंत्राटदारांकडून केवळ चालकच उपलब्ध करून दिले जात होते. पीएमपी'मध्ये कंत्राटी पद्धतीने बससेवा घेण्यास सुरुवात झाल्यापासून कंत्राटदारांकडून बसबरोबर चालकही उपलब्ध करून देण्यात येत असे. वाहक 'पीएमपी' प्रशासनाकडून भरती प्रक्रियेद्वारे नियुक्त करून नेमले जायचे. आता वाहकांची सेवाही कंत्राटदारांकडून उपलब्ध करून देण्यात सहमती दर्शविली आहे.'पीएमपी'मध्ये नव्याने बस दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. कंत्राटदारांच्या १४६ बस ताफ्यात दाखल झाल्या असताना मनुष्यबळाची कमतरता भासू नये म्हणून चालकांबरोबर वाहक असे दोन हजार चालक-वाहक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यांच्याकडूनच या बसच्या संचलनाचे नियोजन केले जाणार आहे. नवीन भरती प्रक्रिया तूर्तास होणार नाही.सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील 'जीवनवाहिनी' असलेल्या 'पीएमपी' प्रशासनात अनेक वर्षांपासून अंतर्गत भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. त्यातच 'पीएमपी'च्या ताफ्यात एक हजार ६०० नवीन बस दाखल करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात ६०० बस दाखल करून घेण्याचे नियोजन केले असून भाडेतत्त्वावरील ४००, तर स्वमालकीच्या २०० बसचे नियोजन आहे.त्यापैकी भाडेतत्त्वावरील १४६ बस ताफ्यात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यातच 'पीएमपी'मध्ये मनुष्यबळाची कमतरता असताना प्रशासनाकडून भाडेतत्त्वावरील कंत्राटदारांकडूनच दोन हजार मनुष्यबळ सेवेत दाखल करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे यामध्ये एक हजार वाहकही कंत्राटी पद्धतीने सेवेत घेतले जाणार आहे. यापूर्वी कंत्राटदारांकडून केवळ चालकच उपलब्ध करून दिले जात होते. पीएमपी'मध्ये कंत्राटी पद्धतीने बससेवा घेण्यास सुरुवात झाल्यापासून कंत्राटदारांकडून बसबरोबर चालकही उपलब्ध करून देण्यात येत असे.

### नव्याने 146 बस ताफ्यात दाखल

आता वाहकांची सेवाही कंत्राटदारांकडून उपलब्ध करून देण्यात सहमती दर्शविली आहे.'पीएमपी'मध्ये नव्याने बस दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. कंत्राटदारांच्या १४६ बस ताफ्यात दाखल झाल्या असताना मनुष्यबळाची कमतरता भासू नये म्हणून चालकांबरोबर वाहक असे दोन हजार चालक-वाहक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

## पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासकीय गतिमानतेत अव्वल!

# महापालिकेला 10 लाखांचे पारितोषिक!

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांना पारितोषिक प्रदान

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र शासनाच्या 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा' अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेस कर संकलन वाढीसाठी केलेल्या विविध उपाय योजनांमध्ये महापालिका अव्वल ठरली असून, या पुरस्काराअंतर्गत १० लाख रुपयांचे पारितोषिक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांना हे पारितोषिक प्रदान करण्यात आले.**



मुंबई येथील सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या नागरी सेवा दिन २०२५ आणि राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२३-२४ व २०२४-२५ पारितोषिक प्रदान समारंभात हे पारितोषिक देण्यात आले. पिंपरी चिंचवड महापालिकेने मालमत्ता कर संकलन वाढीसाठी राबविलेले नवोपक्रम, ऑनलाईन सुविधा, मालमत्ता जप्ती लिलाव, जिओ सिक्वेन्सिंग, यू. पी. आय. सी. आयडी आदी प्रस्तावांमध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी राज्याच्या कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यशदाचे अतिरिक्त महासंचालक राहुल महिवाल, पिंपरी चिंचवड पालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागांचे, जिल्ह्यांचे, महापालिकांचे प्रशासकिय अधिकारी आणि कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

राज्यस्तरीय समितीने महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची सखोल छाननी करून ही निवड केली. मालमत्ताकरवाढीसाठी महानगरपालिकेने राबवलेले उपक्रम, प्रशासनातील पारदर्शकता, तांत्रिक साधनांचा वापर, लोकसहभाग वाढवण्याचा प्रयत्न आणि उत्तम कार्यप्रणाली हे सर्व पैलू यामध्ये महत्वाचे ठरले.

### प्रभावी उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी

**करसंकलनामध्ये विक्रमी वाढ**

२०२१-२२ : ६२८ कोटी रुपये
२०२२-२३ : ८१६ कोटी रुपये
२०२३-२४ : ९७७ कोटी रुपये (यापैकी ५५४ कोटी रुपये ऑनलाइन भरणा)

"कटिबद्ध जनहिताय" या महानगरपालिकेच्या ब्रीदवाक्यानुसार महानगरपालिका कामकाज करत आहे. करसंकलन विभागाने पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, महिला सहभाग आणि नागरिकांच्या सक्रिय सहकार्याच्या आधारावर मालमत्ता कर व्यवस्थापनात उल्लेखनीय बदल घडवून आणला आहे. 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान' अंतर्गत मिळालेला हा पुरस्कार महापालिकेच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचे फलित असून, नागरिकांचा विश्वास आणि सहभाग हेच आमचे खरे बळ आहे. भविष्यातही लोकाभिमुख, गतिमान आणि उत्तरदायित्वपूर्ण प्रशासन देण्याची आमची कटिबद्धता अशीच कायम राहील."

—**शेखर सिंह**, आयुक्त तथा प्रशासक

---

## पिंपरी चिंचवडमध्ये कोयता गँगचा हैदोस!

## भोसरीत 13 कारच्या काचा फोडत माजवली दहशत

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी - चिंचवड शहरात गेल्या काही दिवसांपासून कोयता गँगने अक्षरशः हैदोस घातला आहे. कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्याबरोबरच रस्त्यांवर उभ्या केलेल्या वाहनांची तोडफोड, कोयत्याचा धाक दाखवत दहशत माजविणे, कोयत्याच्या धाकाने खंडणी उकळणे असे सत्र सुरुच आहे.**








भोसरी येथे अल्पवयीन मुलासह दोन जणांनी रस्त्याकडेला उभ्या केलेल्या १२ कार आणि एका टेम्पोची दगड आणि कोयत्याने तोडफोड केली. रविवारी (दि. २०) मध्यरात्री एकच्या सुमारास ही घटना घडली. गुन्हे शाखेच्या गुंडाविरोधी पथकाने सकाळी दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या. करण बाळू ससाणे (वय २०, रा. फुलेनगर, चिंचवड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्या १७ वर्षीय अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेण्यात आले आहे. अमरसिंग मनबहादूर थापा (वय ४७, रा. सुखवानी बाग हौसिंग सोसायटी, आदिनाथनगर, भोसरी) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी थापा हे सुखवानी बाग हौसिंग सोसायटीत रखवालदार म्हणून काम करतात. गव्हाणे वस्ती - आदिनाथनगर रस्त्यावर सुखवानी बाग सोसायटी आहे. सोसायटीतील काही नागरिकांसह आजुबाजूला राहणारे रहिवाशी रात्रीच्या वेळी आपली वाहने या रस्त्याकडेला उभी करतात. रविवारीही नेहमीप्रमाणे रहिवाशांनी आपली वाहने रस्त्याकडेला उभी केली होती. मध्यरात्री एक ते सव्वाएकच्या सुमारास आरोपी करण आणि त्याचा अल्पवयीन साथीदार हातात कोयता घेऊन आले. दगड आणि कोयत्याने त्यांनी रस्त्याकडेला उभ्या केलेल्या दिसेल त्या वाहनांची तोडफोड करण्यास सुरूवात केली. त्यांनी १२ कार आणि एका टेम्पोच्या काचा फोडल्या.

### सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून आवळल्या मुसक्या

पोलीसांनी परिसरातील सीसीटीव्हींची पाहणी केली. सकाळी गुन्हे शाखेच्या गुंडा विरोधी पथकाने दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आरोपी सराईत गुन्हेगार आहेत की नाही याबाबत त्यांचे रेकॉर्ड तपासले जात आहे. तसेच, त्यांनी कोणत्या कारणाने ही तोडफोड केली, याबाबत चौकशी केली जात आहे, असे फौजदार खाडे यांनी सांगितले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सत्समागम म्हणजे संत सांगतील त्याप्रमाणे वागणे.

कोणत्याही मंगल कार्यात सर्वाआधी गणपतीचे आवाहन करतात, आणि सगळे कार्य संपले की सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. “जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी,” अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी. भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. ‘मी कोण’ याचा विचार करावा, आणि तो करण्यासाठी, ‘मी नाही कोणाचा’ हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल हे बघावे. याकरिता, मी कर्ता नसून देव कर्ता आहे असे मानावे, सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा. सत्समागम म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे. संतांवर अनन्य श्रद्धा ठेवा. त्यांच्या चालीने चाला. त्यांच्या समागमात दैन्य मानू नका. जे तुमची एकसारखी विषयातली नडच भागवतील ते संत नव्हेत. खरे संत विषयाची आसक्ती कमी करतात; अशा संताला शरण जावे. निर्विषय चित्त संतांनाच करता येते. संत हे ईश्वरदर्शनाची तळमळ उत्पन्न करतात. तळमळ उत्पन्न करून देणे हीच संतांची कामगिरी. संतांची भाषा तळमळीची असते, म्हणून ती तळमळ उत्पन्न करते. संत सांगतील त्याप्रमाणे वागावे. जग संतांशिवाय असणेच शक्य नाही. जे देहात दिसले पण वस्तुतः देहातीत राहिले ते संतच होत. आम्हांला त्यांना ओळखता येत नाही याला काय करावे ? नामाच्या योगानेच संत ओळखता येतात, जोडता येतात आणि टिकवता येतात. जो भगवंताचे नाम घेईल त्याला संत भेटेल, आणि तो त्याला भगवंताची प्राप्ती करून देईल. त्याचे कुठे अडणार नाही. पण जो नुसत्या शब्दज्ञानाच्या मागे लागेल त्याला आसक्ती सुटणार नाही, आणि त्याचे जीवन सार्थकी लागणार नाही.

**बोधवचनः- संताच्या पदरात पडले की तो आपली लाज राखतो.**

# काँग्रेसमधील आऊटगोईंग, असेच सुरु राहणार का?



## ‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**पुण्यातील रवींद्र धंगेकर, भोरचे संग्राम थोपटे यांच्यासारखे शेकडो युवा नेते काँग्रेसला राम राम का ठोकत आहेत, हा आता चर्चेचा विषय बनला आहे. दोनच दिवसांपूर्वी भाजपाचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत अनेक गावातील सरपंच, उपसरपंचांपासून ते माजी आमदारांपर्यंत काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये एकगठ्ठा प्रवेश केला, ही घटना अगदी ताजी आहे.. आणि आता संग्राम थोपटे !**



### दूरदृष्टीहीन, नेतृत्वहीन काँग्रेस..

काँग्रेसमधील या नवीन तरुण पिढीला काँग्रेसमध्ये काहीच ‘जान’ दिसत नाही, हे मूळ कारण आहे. एकीकडे भाजपामध्ये केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टी.. त्यांनी प्रत्येक गोष्टीत उचललेली विकासाची पावले दिसून येत आहेत, तर काँग्रेस मात्र अत्यंत ढिली, दूरदृष्टिहीन, कणाहीन आणि नेतृत्वहीन बनत चालण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. केंद्रातील नेतृत्व म्हणजेच सोनिया गांधी आणि राहुल गांधी ! मल्लिकार्जुन खर्गे हे अध्यक्ष असले तरी त्यांच्याकडे पक्ष वाढवण्याची कल्पकता, क्षमता, वकूब आणि दूरदृष्टी मुळीच नाही, हे काँग्रेस कार्यकर्त्यांना देखील माहीत आहे.

### घराणेशाही एवढे एकमेव भांडवल..

सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याकडे फक्त घराणेशाही एवढेच भांडवल शिल्लक आहे. त्यात सोनिया गांधी आता सार्वजनिक कार्यक्रमातही दिसत नाहीत तर, राहुल गांधी हे दररोज काही ना काही तरी तारे तोडतात, ज्याचा पक्षावर उलटा परिणाम होत आहे. थोडक्यात काय, पक्षाला वेगाने पुढे नेईल, असे काहीच दिसत नसल्याने युवा पिढी संभ्रमात आहे आणि मग ती भाजपच्या मागे धावली तर दोष कुणाचा ? दुसरीकडे महाराष्ट्रामध्येही काँग्रेसकडे असा नेता दिसत नाही, की जो पक्षाला या अपयशाच्या गर्तेतून बाहेर काढेल आणि यशाची उत्तुंग शिखरे दाखवेल ! नाना पटोले, यशोमती ठाकूर, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात ही आता संपलेली आणि चोथा झालेली नावे आहेत. सतेज पाटील किंवा विश्वजीत कदम अशी युवा पिढी जर चांगल्या पद्धतीने हाताळली नाही, तर संग्राम थोपटे किंवा रवींद्र धंगेकर यांच्या मार्गानेच ते गेले तर आश्चर्य वाटू नये !

### टीका करणे एवढेच ‘लक्ष्य’..

काँग्रेस अजूनही आपल्याच धुंदीत वावरत आहे. शंभर वर्षांची परंपरा, स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचा दृष्टिकोन या जुन्या आणि बुरसटलेल्या आठवणींमधून काँग्रेस पक्ष बाहेर येतच नाही. भारतीय जनता पक्षाने कोणतेही पाऊल उचलले, तर त्यावर टीका करणे एवढा एक कलमी कार्यक्रम सुरू आहे. पक्षाच्या विकासाची दृष्टी सांगण्याची त्यांची इच्छाही नाही. थोडक्यात काय, भाजपा विकासाची दृष्टी म्हणजे होकारात्मक दृष्टी दाखवतो, तर त्यांची पावले कशी चुकीची हा नकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून काँग्रेसची पावले पडत आहेत !

### राहुल गांधी असेपर्यंत अवघडच!

ज्या राहुल गांधी यांच्याकडे नेतृत्व सोपवून काँग्रेस पक्ष बिनधास्त आहे, त्या राहुल गांधींची बालिश वर्तणूक, त्यांचा अभ्यास, त्यांची भाषणे पाहिली तर ते भाजपाचे ‘ब्रँड अँबेसिडर’ असून भाजपालाच मदत करीत आहेत की काय? असे वाटते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक निवडणुका काँग्रेसने गमावल्या आहेत..दर वेळेला एक एक राज्य त्यांच्या हातून चालले आहे, तरी काँग्रेसचे डोळे कसे उघडत नाहीत ? ही बाब जास्तच चिंताजनक आहे.

### उज्वल भवितव्यासाठी सोडचिठ्ठी..

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसला रामराम ठोकला त्यावेळी स्पष्ट सांगितले, की काँग्रेसबद्दल आपल्याला काहीही बोलायचे नाही, पण उज्ज्वल भवितव्यासाठी मी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करत आहे. आज काँग्रेस सोडणाऱ्या प्रत्येकाचे हेच म्हणणे आहे. आता, काँग्रेसबद्दल बोलण्यात काहीही अर्थ नाही, केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस हे अजून साडेचार वर्षे हलत नाहीत.. त्यात ते सत्तेची खुंटी जास्तच बळकट करत आहेत, म्हणजेच काँग्रेसमध्ये राहून, भवितव्य नसलेल्या विरोधी पक्षात बसून बाके बडवण्याशिवाय काहीही काम नाही, हे प्रत्येकाच्या लक्षात येत आहे.

### संग्राम थोपटे यांचे म्हणणे..

काँग्रेसला नुकतीच सोडचिठ्ठी देणारे भोरचे संग्राम थोपटे काय म्हणतात, हे म्हणूनच महत्त्वाचे आहे. शून्य भवितव्य आणि मृतवत् अस्तित्व ही आता काँग्रेस पक्षाची खासियत बनली आहे, असे त्यांना सूचित करायचे असावे. मला काँग्रेसकडून कुठेही थांबवण्याचा प्रयत्न झाला नाही. खरं तर, मला काँग्रेस सोडण्याची वेळ काँग्रेसनेच आणली आहे. एकेकाळी विधानसभेच्या अध्यक्षपदासाठी याच काँग्रेसने संग्राम थोपटे यांचे नाव सुचवले होते, त्यांची आजची ही अवस्था, पुरेशी बोलकी आहे.

### काँग्रेसकडून सतत अन्यायच..

थोपटे यांनी म्हटलं आहे, की २००९ साली मी पहिल्यांदा या मतदारसंघातून निवडून आलो. तेव्हा मी नवीन होतो. त्यानंतर २०१४ ला आणि २०१९ साली पुन्हा निवडून आलो. तेव्हा ‘महाविकास आघाडी’ चं सरकार सत्तेत आलं. तेव्हा काँग्रेसला बारा मंत्रिपदं मिळाली होती. मला संधी मिळेल अशी भावना होती. पण, तेव्हा मला संधी मिळाली नाही. नाना पटोले यांनी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, तेव्हा मला वाटलं होतं, की मला संधी मिळेल. पण तेव्हाही मला संधी मिळाली नाही. त्यानंतर महाविकास आघाडीचं सरकार सत्तेतून गेल्यानंतर विरोधी पक्षनेतेपदाची संधी मिळेल., अशी अपेक्षा होती, पण तेव्हाही संधी मिळाली नाही. त्यामुळं कार्यकर्त्यांची भावना आता अशी झाली आहे की पुण्यासारख्या जिल्ह्यात देखील तुम्ही तीनवेळा निवडून आलात, तरीदेखील तुम्हाला संधी मिळाली नाही. त्यामुळे पक्ष बदलण्याचा निर्णय घेतला पाहिजे. त्यामुळे हा निर्णय घेतला आहे, माझ्यापुढे दुसरा पर्याय दिसत नाही, असे देखील त्यांनी ठासून सांगितले आहे.

### काही दिवसांपूर्वी धंगेकर, आता थोपटे..

काही दिवसांपूर्वी माजी आमदार धंगेकर यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर आता संग्राम थोपटे यांनी देखील काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिल्यामुळे राज्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे, हे त्यांचे नेते मान्य करत नसले तरी पक्षाला घरघर लागली आहे, हे सूज्ञ मतदाराला कळते. हे नेते आपल्या मनात काय आहे ते कार्यकर्त्यांच्या तोंडी घालतात. कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे, की तुम्ही अनेक वर्ष काँग्रेसचं काम करत आहात. मात्र, प्रामाणिकपणे काम करत असतानाही पक्षानं तुम्हाला कायम डावलण्याचं काम केलं. मतदारसंघात तुम्ही विकासाची कामे केली, पण, अजून विकासाच्या कामांना गती द्यायची असेल तर आपल्याला दुसऱ्या पक्षात जावं लागेल. त्यामुळे अशा पद्धतीचा निर्णय कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेतला आहे, असं संग्राम थोपटे यांनी म्हटलं आहे.

### काँग्रेसची गळती सुरूच राहणार ?

काँग्रेस पक्षाला भवितव्य दिसत नसल्यामुळे त्यांच्यातील कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची गळती अशीच सुरू राहणार आहे. प्रत्येक वेळी एखादा नेता गेला म्हणून पक्ष संपला का? असा खडा सवाल त्यांचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष विचारणार आहेत! जनतेला आता टोमणेबाजीचा कंटाळा आला आहे आणि समोर विकासकामे दिसत आहेत. एखादा नेता गेल्यामुळे पक्षाला काहीही फरक पडला नाही,असे उद्गार काढल्यामुळे उबाठा गटाची काय अवस्था झाली आहे, हे काँग्रेसचे नेते जवळून पाहत आहेत, पण त्यांची यत्किंचितही सुधारण्याची इच्छा नाही, अशा या मूर्खपणाला काय म्हणावे ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गोमूत्र पितो ते आरोग्यासाठी चांगले असते!

## मी कायम खरं बोलतो, खरं बोलल्याने वाद होतात : नितेश राणे



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्रातील मत्स्य आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. उद्धव ठाकरे जे राज ठाकरेंबाबत म्हणत आहेत त्याला रश्मी ठाकरे यांची मान्यता आहे का? असा बोचरा प्रश्न नितेश राणेंनी विचारला आहे. तसंच नितेश राणेंनी मी गोमूत्र पितो ते आरोग्यासाठी चांगलं असतं असं म्हटलं आहे.**

### ठाकरेंनी घाणेरडं राजकारण केलं

मी त्यांना हिंदू विरोधी म्हणेन किंवा जिहाद हृदय सम्राट म्हणेन. महाराष्ट्रात खरी टक्कर कुणाशी आहे शरद पवार की आदित्य ठाकरे यांच्याशी आहे? असं विचारलं असता शरद पवार हे खूप मोठे नेते आहेत. आदित्य ठाकरे आत्ता राजकारणात आले आहेत त्यामुळे यापैकी कुणी नाही असं म्हटलं आहे. नेते नसता तर काय असता तर वकील असता असं विचारलं असता ते म्हणाले मी नेते नसतो तर वकील असतो असं नितेश राणे म्हणाले. मी गोमूत्र भरपूर पितो कारण ते आरोग्यासाठी चांगलं असतं असं नितेश राणेंनी म्हटलं आहे. ३९ वर्षे आम्ही (राणे कुटुंब) बाळासाहेब ठाकरेंबरोबर होतो. उद्धव ठाकरेंनी घाणेरडं राजकारण केलं.

आम्ही होतो. उद्धव ठाकरेंनी आमच्याबरोबर वाईट राजकारण केलं नसतं तर आम्ही गर्वाने म्हटलं असतं की आम्ही शिवसैनिक आहोत. माझ्या वडिलांनी हिंदुत्वासाठी जे केलं आहे ते मी एखाद्या पॉडकास्टमध्ये बोलू शकत नाही. तसंच उद्धव ठाकरे हे सध्या राज ठाकरेंबरोबर एकत्र येण्याबाबत बोलत आहेत. पण हे रश्मी वहिनींना त्यांनी विचारलं आहे का? या दोघांनी एकत्र यायला त्यांची मान्यता आहे का? असा खोचक प्रश्न नितेश राणेंनी विचारला.तुम्ही रुह अफजा पिता का? असा प्रश्न नितेश राणेंना पॉडकास्टमध्ये विचारण्यात आला त्यावर ते चटकन म्हणाले, मी रुह अफजा वगैरे पित नाही. रुह अफजा देणारा माणूस कोण त्यावर ते अवलंबून आहे. रुह अफजा मला कुणीही चांगल्या भावनेने देणार नाही. तुम्ही विचार करा रुह अफजा नितेश राणेला कोण देईल? रुह अफजा फार गोड असतं ते मला आवडतही नाही. मी गोमूत्र पितो, आज मी तुम्हाला सांगतो की ते आरोग्यासाठी फार चांगलं असतं असं नितेश राणेंनी म्हटलं आहे. एबीपी न्यूजला दिलेल्या पॉडकास्टमध्ये नितेश राणेंनी दिलं आहे.उद्धव ठाकरेंच्या विरोधात तुम्ही एका शब्दात टीका करायची असेल तर तुम्ही कुठला शब्द वापराल असं विचारलं असता नितेश राणे म्हणाले मी त्यांना हिंदू विरोधी म्हणेन किंवा जिहाद हृदय सम्राट म्हणेन. महाराष्ट्रात खरी टक्कर कुणाशी आहे शरद पवार की आदित्य ठाकरे यांच्याशी आहे? असं विचारलं असता शरद पवार हे खूप मोठे नेते आहेत. आदित्य ठाकरे आत्ता राजकारणात आले आहेत त्यामुळे यापैकी कुणी नाही असं म्हटलं आहे. नेते नसता तर काय असता तर वकील असता असं विचारलं असता ते म्हणाले मी नेते नसतो तर वकील असतो असं नितेश राणे म्हणाले. मी गोमूत्र भरपूर पितो कारण ते आरोग्यासाठी चांगलं असतं असं नितेश राणेंनी म्हटलं आहे. ३९ वर्षे आम्ही (राणे कुटुंब) बाळासाहेब ठाकरेंबरोबर होतो. उद्धव ठाकरेंनी घाणेरडं राजकारण केलं. आम्ही लहानपणापासून बाळासाहेब ठाकरेंनाच मानत आलो आहोत. १२ वर्षे आम्ही काँग्रेसमध्ये होतो तेव्हाही आमच्या रक्ताचा रंग भगवाच होतो. तसंच भाजपात आल्यानंतर आमच्या रक्ताचा रंग भगवाच आहे असं नितेश राणे यांनी म्हटलं आहे.३९ वर्षे माझे वडील बाळासाहेब ठाकरेंसह होते. आम्ही होतो. उद्धव ठाकरेंनी आमच्याबरोबर वाईट राजकारण केलं नसतं तर आम्ही गर्वाने म्हटलं असतं की आम्ही शिवसैनिक आहोत. माझ्या वडिलांनी हिंदुत्वासाठी जे केलं आहे ते मी एखाद्या पॉडकास्टमध्ये बोलू शकत नाही. तसंच उद्धव ठाकरे हे सध्या राज ठाकरेंबरोबर एकत्र येण्याबाबत बोलत आहेत. पण हे रश्मी वहिनींना त्यांनी विचारलं आहे का? या दोघांनी एकत्र यायला त्यांची मान्यता आहे का? असा खोचक प्रश्न नितेश राणेंनी विचारला.तुम्ही रुह अफजा पिता का? असा प्रश्न नितेश राणेंना पॉडकास्टमध्ये विचारण्यात आला त्यावर ते चटकन म्हणाले, मी रुह अफजा वगैरे पित नाही. रुह अफजा देणारा माणूस कोण त्यावर ते अवलंबून आहे. रुह अफजा मला कुणीही चांगल्या भावनेने देणार नाही. तुम्ही विचार करा रुह अफजा नितेश राणेला कोण देईल? रुह अफजा फार गोड असतं ते मला आवडतही नाही. मी गोमूत्र पितो, आज मी तुम्हाला सांगतो की ते आरोग्यासाठी फार चांगलं असतं असं नितेश राणेंनी म्हटलं आहे. उद्धव ठाकरेंच्या विरोधात तुम्ही एका शब्दात टीका करायची असेल तर तुम्ही कुठला शब्द वापराल असं विचारलं असता नितेश राणे म्हणाले .

# लाडकी बहीणचा एप्रिलचा हप्ता कधी मिळणार?

## निकष बदलले का? आदिती तटकरेंनी दिली महत्त्वाची माहिती!



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पुढचा हप्ता म्हणजेच एप्रिल महिन्याचा हप्ता केव्हा येणार याकडे सर्व पात्र महिलांचे लक्ष लागलेले आहे. या योजनेचे पैसे खात्यात जमा झालेत की नाही हे तपासण्याकरता अनेक महिला बँकेत रांगाही लावत आहेत. मात्र, एप्रिल महिन्याचे पैसे अद्यापही सरकारकडून देण्यात आलेले नसून यासंदर्भात महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी महत्त्वाची माहिती दिली. त्या आज माध्यमांशी बोलत होत्या.**

### योजनेतील निकष बदलणार का?

त्या लाडकी बहीण योजनेसाठी पात्र नाहीत. ज्या महिला नमो शेतकरी योजनेचा लाभ घेत आहेत, त्यांना १००० रुपये मिळत नमो शेतकरी योजनेतील मिळतील आणि तर ५०० रुपये लाडकी बहीण योजनेमधून मिळतील. हेच मूळ शासननिर्णयातही म्हटलं आहे", असंही आदिती तटकरे म्हणाल्या.

या योजनेअंतर्गत अडीच लाखांच्या उत्पन्न असलेल्या महाराष्ट्रातील महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. या योजनेकरता इतर अनेक निकषही शासननिर्णयानुसार लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार, सध्याच्या घडीला राज्यात २ कोटी ४७ लाख महिला या योजनेसाठी पात्र आहेत. जुलैपासून सहा हप्ते पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. एप्रिलचा सातवा हप्ता असून हा महिना संपत आला तरीही या योजनेअंतर्गत लाभ महिलांच्या खात्यात जमा झालेला नाही. त्यामुळे यासंदर्भात सातत्याने सरकारला प्रश्न विचारला जात आहे.आज माध्यमांशी संवाद साधताना महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या,"एप्रिल महिना संपण्याच्या आधी पात्र महिलांच्या खात्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ वितरीत केला जाणार आहे." दरम्यान, आदिती तटकरे यांनी यासंदर्भात कोणतीही थेट तारीख दिली नसून आता महिना संपण्यास अवघे ९ दिवस उरलेले असताना सरकारकडून पात्र महिलांना हे पैसे कधी मिळणार याबाबत चर्चेला जोर आला आहे. काही वृत्तांनुसार, अक्षय तृतीयेला हा निधी वितरीत केला जाणार आहे. ३० एप्रिलला अक्षय तृतीया आहे. त्यामुळे आता पात्र महिलांना ३० एप्रिलपर्यंत वाट पाहावी लागण्याची शक्यता आहे.दरम्यान, या योजनेतील पात्र महिलांच्या अर्जांच्या छाननी प्रक्रियेविषयी विचारण्यात आलं. तेव्हा आदिती तटकरे म्हणाल्या, "सुरुवातीपासून या योजनेसंदर्भात फार गैरसमज पसरवले गेले आहेत. अडीच लाखांचे उत्पन्न असलेल्यांनाच हा लाभ मिळणार आहे. त्यात नवं काही नाही. लाडकी बहीण योजनेचा शासननिर्णयात हेच नमूद आहे." "ज्या महिला इतर सरकारी योजनांचा लाभ घेत आहेत, संजय गांधी निराधार योजनेतून घेत असतील, तर त्यांना त्या योजनेचे १५०० रुपये मिळत आहेत.

# पोप फ्रान्सिस यांचे निधन!

## व्हॅटिकनकडून व्हिडीओ संदेशाद्वारे माहिती

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पोप फ्रान्सिस यांचं निधन झाल्याची माहिती व्हॅटिकनकडून देण्यात आली आहे. सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांचं निधन झालं. त्यांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य रोम येथील चर्चच्या सेवेसाठी वेचलं. पोप फ्रान्सिस यांनी आपल्याला आयुष्यातली मूल्यं शिकवली. तसंच धैर्य आणि प्रेम यांचा संदेश दिला असं म्हणत व्हॅटिकनने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे. AP ने पोप फ्रान्सिस यांचं निधन झाल्याची माहिती दिली आहे. व्हॅटिकनकडून एक व्हिडीओ संदेश देण्यात आला. त्या संदेशात पोप फ्रान्सिस यांच्या निधनाचं वृत्त देण्यात आलं.**



रोमन कॅथलिक चर्चचे पहिले लॅटिन अमेरिकन पोप फ्रान्सिस यांचं निधन झालं. त्यांच्या फुफ्फुसांमध्ये न्यूमोनिया संसर्ग झाला होता. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. फेब्रुवारी महिन्यात रोम येथील जेमेली रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यावेळी त्यांची प्रकृती आधी ढासळली होती पण नंतर हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली आणि त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आज सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांची प्राणज्योत मालवली.कार्डिनल जॉर्ज मारियो बर्गोग्लिओ यांची २०१३ मध्ये बेनेडिक्ट सोळावे यांचे उत्तराधिकारी म्हणून निवड झाली होती. त्यांना पोप फ्रान्सिस म्हटलं जातं. पोपपदी येणारे युरोपबाहेरचे ते पहिले पोप ठरले होते. २६६ व्या पोपपदी त्यांची निवड झाली त्यावेळी सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. रोमन कॅथलिक चर्चचे नेतृत्व करताना १२ वर्षांच्या काळात पोप फ्रान्सिस यांना अनेकवेळा रुग्णालयात दाखल व्हावं लागलं. तसंच अनेक वैद्यकीय समस्यांचा सामनाही करावा लागला. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांचं एक फुफ्फुस काढावं लागलं होतं. मार्च २०२३ मध्ये त्यांना ब्रॉंकायटिसमुळंच तीन दिवस रुग्णालयात दाखल राहावं लागलं होतं. त्यानंतर जून महिन्यात त्यांच्यावर हर्नियाची शस्त्रक्रियाही करण्यात आली. आणखी एका आजारपणामुळं त्यांना २०२३ मध्ये यूएईमध्ये झालेल्या हवामान परिषदेलाही उपस्थित राहता आलं नव्हतं. आतापर्यंतचे सर्व पोप हे व्हॅटिकन सिटीतील भलंमोठं पेंट हाऊस अपार्टमेंट वापरत असत. परंतु, पोप फ्रान्सिस यांनी ते पेंट हाऊस नाकारलं आणि स्वतःसाठी गेस्ट हाऊसमधील छोटंसं घर निवडलं होतं. त्यामुळे त्यांच्या या निर्णयाचीही चर्चा झाली होती. पोप फ्रान्सिस यांनी जागतिक अर्थव्यवस्थेत परवलीचा शब्द असलेल्या मुक्त-बाजार या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. चर्चने समलिंगी लोकांबद्दल मत बनवण्यापेक्षा त्यांची माफी मागितली पाहिजे असं वक्तव्य केलं होतं. त्यांच्या या भूमिकांमुळेही ते चर्चेत राहिले.रोमन कॅथलिक चर्चचे पहिले लॅटिन अमेरिकन पोप फ्रान्सिस यांचं निधन झालं. त्यांच्या फुफ्फुसांमध्ये न्यूमोनिया

संसर्ग झाला होता. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. फेब्रुवारी महिन्यात रोम येथील जेमेली रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यावेळी त्यांची प्रकृती आधी ढासळली होती पण नंतर हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली आणि त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आज सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांची प्राणज्योत मालवली.कार्डिनल जॉर्ज मारियो बर्गोग्लिओ यांची २०१३ मध्ये बेनेडिक्ट सोळावे यांचे उत्तराधिकारी म्हणून निवड झाली होती. त्यांना पोप फ्रान्सिस म्हटलं जातं. पोपपदी येणारे युरोपबाहेरचे ते पहिले पोप ठरले होते. २६६ व्या पोपपदी त्यांची निवड झाली त्यावेळी सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. रोमन कॅथलिक चर्चचे नेतृत्व करताना १२ वर्षांच्या काळात पोप फ्रान्सिस यांना अनेकवेळा रुग्णालयात दाखल व्हावं लागलं. तसंच अनेक वैद्यकीय समस्यांचा सामनाही करावा लागला. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांचं एक फुफ्फुस काढावं लागलं होतं. मार्च २०२३ मध्ये त्यांना ब्रॉंकायटिसमुळंच तीन दिवस रुग्णालयात दाखल राहावं लागलं होतं.

### 2013 मध्ये पोपपदी निवड

आतापर्यंतचे सर्व पोप हे व्हॅटिकन सिटीतील भलंमोठं पेंट हाऊस अपार्टमेंट वापरत असत. परंतु, पोप फ्रान्सिस यांनी ते पेंट हाऊस नाकारलं आणि स्वतःसाठी गेस्ट हाऊसमधील छोटंसं घर निवडलं होतं. त्यामुळे त्यांच्या या निर्णयाचीही चर्चा झाली होती. पोप फ्रान्सिस यांनी जागतिक अर्थव्यवस्थेत परवलीचा शब्द असलेल्या मुक्त-बाजार या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. चर्चने समलिंगी लोकांबद्दल मत बनवण्यापेक्षा त्यांची माफी मागितली पाहिजे असं वक्तव्य केलं होतं. त्यांच्या या भूमिकांमुळेही ते चर्चेत राहिले. पोप फ्रान्सिस यांनी आपल्याला आयुष्यातली मूल्यं शिकवली. तसंच धैर्य आणि प्रेम यांचा संदेश दिला असं म्हणत व्हॅटिकनने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे.

---

# तुम्ही निवडणूक आयुक्त नव्हता

## आपण या देशातील लोकांची एकजूट वाढवली पाहिजे : दुबे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्यावर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी टीका केली. त्यांना मुस्लिम आयुक्त संबोधित करून सर्वाधिक बांगलादेशी घुसखोरांना त्यांच्या काळात मतदार बनवण्यात आल्याचा दावा दुबे यांनी केला. दुबे यांच्या या टीकेवर आता कुरेशी यांनी सडेतोड उत्तर दिलं आहे.**





मी भारताच्या अशा कल्पनेवर विश्वास ठेवतो की जिथे व्यक्तीची व्याख्या त्याच्या योगदानावरून होते. काही लोकांसाठी धार्मिक ओळखी त्यांच्या द्वेषपूर्ण राजकारणाला पुढे नेण्यासाठी प्रमुख घटक आहेत. भारताने आपल्या संवैधानिक संस्था आणि तत्त्वांसाठी नेहमीच उभे राहून लढा दिला आहे, आहे आणि राहील. मी निवडणूक आयुक्त या संवैधानिक पदावर माझ्या क्षमतेनुसार काम केले आणि आयएएसमध्ये माझी दीर्घ आणि समाधानकारक कारकीर्द होती", असं कुरेशी म्हणाले. असं वृत्त पीटीआयने दिलं आहे. कुरैशी जुलै २०१० ते जून २०१२ पर्यंत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते.वक्फ कायद्याबाबत एस. वाय. कुरेशी यांनी सोशल मीडिया पोस्ट केली होती. "वक्फ कायदा निःसंशयपणे मुस्लिमांची जमीन बळकावण्यासाठीची सरकारची भयानक योजना आहे. मला खात्री आहे की सर्वोच्च न्यायालय यावर प्रश्न उपस्थित करेल. भाजपाच्या अपप्रचार व्यवस्थेने चुकीची माहिती पसरवण्याचं त्यांचं काम उत्तमपणे केलं आहे."कुरेशी यांच्या या पोस्टला उत्तर देताना भाजपाचे खासदार निशिकांत दुबे म्हणाले, "तुम्ही निवडणूक आयुक्त नव्हतात, तुम्ही मुस्लिम आयुक्त होता. तुमच्या कार्यकाळात झारखंडमधील संथाल परगणामध्ये सर्वाधिक बांगलादेशी घुसखोरांना मतदार बनवण्यात आले. पैगंबर मुहम्मद यांचा इस्लाम भारतात ७१२ मध्ये आला. त्यापूर्वी ही जमीन (वक्फ) हिंदू किंवा त्या धर्माशी संबंधित आदिवासी, जैन किंवा बौद्धांची होती," असे ते पुढे म्हणाले. दुबे पुढे म्हणाले, "आपण या देशातील लोकांची एकजूट वाढवली पाहिजे. देश एकजुट करा, इतिहास वाचा. या देशाचे दोन तुकडे करून पाकिस्तान जन्माला आला आहे. आता पुन्हा एकदा देशाची फाळणी होणार नाही."मी भारताच्या अशा कल्पनेवर विश्वास ठेवतो की जिथे व्यक्तीची व्याख्या त्याच्या योगदानावरून होते. काही लोकांसाठी धार्मिक ओळखी त्यांच्या द्वेषपूर्ण राजकारणाला पुढे नेण्यासाठी प्रमुख घटक आहेत. वक्फ कायद्याबाबत एस. वाय. कुरेशी यांनी सोशल मीडिया पोस्ट केली होती.

### दुबे यांच्या टीकेवर सडेतोड उत्तर

माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्यावर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी टीका केली. त्यांना मुस्लिम आयुक्त संबोधित करून सर्वाधिक बांगलादेशी घुसखोरांना त्यांच्या काळात मतदार बनवण्यात आल्याचा दावा दुबे यांनी केला. दुबे यांच्या या टीकेवर आता कुरेशी यांनी सडेतोड उत्तर दिलं आहे.

# जॅकलिनने घेतलं सिद्धिविनायकचं दर्शन

अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. जॅकलिन मूळची श्रीलंकेची असली तरी भारतात तिनं तिच्या चित्रपटांमधून प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यामुळे तिचा मोठा चाहता वर्ग असल्याचेही पाहायला मिळते. तर, लवकरच जॅकलिन काही नवीन चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. परंतु, सध्या ती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. जॅकलिननं नुकतंच मुंबईतील सिद्धिविनायक गणपतीचं दर्शन घेतलं असून, यावेळी दर्शनासाठी ती एकटी नसून, तिच्यासह एलॉन मस्क यांच्या आईदेखील तेथे उपस्थिती होत्या. जॅकलिननं या वेळचं इस्टर हे वेगळ्या पद्धतीनं साजरं केलं असून, या वर्षी सिद्धिविनायक मंदिरात तिनं गणपती बाप्पाचं दर्शन घेत हा दिवस साजरा केला. महत्त्वाचं म्हणजे तिच्यासह एलॉन मस्क



यांच्या आई मये मस्क (MAYE MUSK) दर्शन घेताना दिसल्या. जॅकलिननं सिद्धिविनायक मंदिरातला माझा अनुभव खूप छान होता, असं म्हणत तिची मैत्रीण मये मस्क भारतात त्यांच्या पुस्तकाच्या प्रदर्शनासाठी आल्याचं सांगितलं आहे. विशेषतः वय हा फक्त एक आकडा आहे आणि ते तुमची स्वप्नं आणि ध्येयं गाठण्यापासून रोखू शकत नाही".तर, मये मस्क काही दिवसांपासून भारतात असून, त्यांनी 'अ वूमन मेक्स अ प्लॅन' हे पुस्तक लिहिलं आहे. पुस्तकाच्या प्रदर्शनासाठी भारतात आलेल्या आई मये मस्कसाठी एलॉन यांनी त्यांना पुष्पगुच्छ पाठवीत त्यांचं अभिनंदन केलं. त्याबाबत स्वतः मये यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत सांगितलं होतं. तर, सध्या त्या जॅकलिनसह सिद्धिविनायक मंदिरात दर्शन घेताना दिसल्या. तसेच, नुकताच मये यांनी मुंबईत त्यांचा ७७ वा वाढदिवसही साजरा केला.दरम्यान, जॅकलिन 'हाऊसफुल ५' या आगामी चित्रपटातून लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. जॅकलिनसह या चित्रपटात अक्षय कुमार, संजय दत्त, कीर्ती सेनन, रितेश देशमुख, जॅकी श्रॉफ, अभिषेक बच्चन, जॉन इब्राहिम, शरद केळकर, मिथुन चक्रवर्ती यांसारखी इतर बरीच कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत.



# इसाबेल बॉलीवूड पदार्पणासाठी सज्ज


'नमस्ते लंडन', 'मेरे ब्रदर की दुल्हन', 'अजब प्रेम की गजब कहानी', 'जिंदगी ना मिलेगी दोबारा', 'धूम ३', 'बँग बँग' या आणि अशा अनेक लोकप्रिय चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री म्हणजे कतरीना कैफ. कतरिना ही बॉलिवूडची यशस्वी मॉडेल आणि अभिनेत्री आहे. आता तिच्याच पाउलावर पाऊल ठेवत तिची बहीणही या क्षेत्रात पदार्पण करण्यास सज्ज झाली आहे.कतरिना कैफची बहीण इसाबेल ही बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार अशा चर्चा अनेक दिवसांपासून सुरू होत्या. अखेर या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळाला आहे. इसाबेल पुलकित सम्राटसह बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. 'सुस्वागतम खुशामदीद' या चित्रपटातून पदार्पण करणार आहे. या चित्रपटामध्ये पुलकित दिल्लीमधील अमन नावाच्या एका मुलाची भूमिका करणार असून इसाबेल आग्र्यातील नूर नावाच्या मुलीची भूमिका साकारणार आहे.पुलकित सम्राट आणि इसाबेल यांच्या 'सुस्वागतम खुशामदीद' या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. पुलकित सम्राटने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून 'सुस्वागतम खुशामदीद' चित्रपटाचा टीझर शेअर केला आहे.

# 'छावा' चित्रपटाची जबरदस्त कमाई

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत 'छावा' या चित्रपटात अभिनेता विक्की कौशल, रश्मिका मंदाना व अक्षय खन्ना हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांत पाहायला मिळाले. तर चित्रपट प्रदर्शित झाल्या दिवसापासून चांगली कमाई करीत आहे. आतापर्यंत या चित्रपटाने ६०० कोटींची कमाई केली आहे. तर आतापर्यंतचा या वर्षातील सर्वाधिक चालणारा 'छावा' हा तिसरा चित्रपट ठरला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित असलेल्या या चित्रपटाला भारतासह बाहेरील देशांमध्येही भरभरून प्रतिसाद मिळाला. अशातच आता चित्रपटात शंभूराजेंच्या भूमिकेत पाहायला मिळालेला अभिनेता विक्की कौशलच्या वडिलांनी म्हणजेच शाम कौशल यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत आभार मानले आहेत. विक्कीचे वडील व प्रसिद्ध ॲक्शन डिरेक्टर शाम कौशल यांनी नुकतीच इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर केली आहे. शाम कौशल यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये 'छावा' चित्रपटाचे पोस्टर पाहायला मिळत असून, या फोटोवर "६०० नॉट आऊट, ऑल टाइम ब्लॉक बस्टर. 'पुष्पा २ हिंदी', 'स्त्री २'नंतर सर्वाधिक कमाई करणारा 'छावा' हा तिसरा चित्रपट ठरला आहे", असं लिहिलं आहे. या पोस्टखाली 'छावा' चित्रपटाला एवढा चांगला प्रतिसाद देण्यासाठी आभार, असं कॅप्शनमध्ये लिहिलेलं आहे. तर या पोस्ट खाली अनेकांनी 'छावा की शान में चमका बॉक्स ऑफिस', 'जय श्री राम', 'अभिनंदन' अशा कमेंट्स केलेल्या पाहायला मिळत आहेत.

# अक्षयने ४. ८५ कोटींना घेतलेली जागा विकली

बॉलीवूडमध्ये अभिनेता अक्षय कुमारला खिलाडी कुमार म्हणून ओळखले जाते. अभिनेत्याची प्रमुख भूमिका असलेला 'केसरी २' सध्या प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र अक्षय कुमार सध्या त्याच्या चित्रपटामुळे नाही तर त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आला आहे.अक्षय कुमारने त्याचे ऑफिस विकले आहे. अभिनेत्याने त्याचे लोअर परळमधील ऑफिस विकले आहे. स्क्वेअर याईसकडे असलेल्या कागदपत्रांनुसार हा व्यवहार हा एप्रिल महिन्यात झाला आहे. या ऑफिसचे क्षेत्रफळ हे १. १४६. ८८ कोटी इतके असून त्याल दोन कार पार्किंगची जागादेखील आहे. हा व्यवहार करताना स्टॅम्प ड्युटी ४८ लाख भरावी लागली. तर ३० हजार नोंदणी फी भरावी लागली.अक्षय कुमारने ही जागा २०२० मध्ये खरेदी केली होती. अभिनेत्याने डिसेंबर २०२० मध्ये ४. ८५ कोटी रुपयांना विकत घेतले होते. आता त्याने ही मालमत्ता ८ कोटींना विकली आहे. त्याला जवळजवळ ६५ टक्के फायदा झाला आहे. लोअर परळ ही मुंबईतील महत्वाचे ठिकाण आहे. या ठिकाणी अभिषेक बच्चन, शाहिद कपूर, अमिश त्रिपाठी, मनोज वाजपेयी अशा अनेक कलाकारांच्या प्रॉपर्टी या ठिकाणी आहेत. अक्षय कुमारची संपत्ती ही २५०० कोटींच्या आसपास आहे. त्याचा स्वतःचा सी-फेस बंगला आहे. या बंगल्याची किंमत ८० कोटी इतकी आहे. या बंगल्यात होम थिएटर, मोठे गार्डन आहे. याबरोबरच,



त्याचे स्वतःचे १८७८ चौरस फुट क्षेत्रफळ असलेले अपार्टमेंट आहे. या अपार्टमेंटची किंमत ७.८ कोटी इतकी आहे. याशिवाय अक्षय कुमारचा पोर्तुगीज स्टाईल व्हिला आहे. या व्हिलाची किंमत ५ कोटी आहे.अक्षय कुमारच्या कामाबद्दल बोलायचे तर त्याचा नुकताच स्काय फोर्स हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटातील त्याच्या भूमिकेला प्रेक्षकांचे प्रेम मिळाले. विशेष म्हणजे गेल्या काही काळापासून अक्षय कुमारची प्रमुख भूमिका असलेल्या चित्रपटांना अपयश येत होते. मात्र, स्काय फोर्स या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. नुकताच त्याचा केसरी चाप्टर २: द अनटोल्ड स्टोरी ऑफ जालियनवाला बाग हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे.

# साई सुदर्शनने रचला इतिहास!

## राशिदला ट्रोल करणाऱ्यांना साईचं जोरदार प्रत्युत्तर

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणारा गुजरात टायटन्स संघ सध्या तुफान फॉर्ममध्ये आहे. कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्स आणि गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना पाहायला मिळाला. या सामन्यात गुजरातचा संघ अनुभवी अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्स संघावर भारी पडला. हा सामना गुजरातने ३९ धावांनी आपल्या नावावर केला. या सामन्यानंतर साई किशोरने अनुभवी गोलंदाज राशिद खानबद्दल मन जिंकणारं वक्तव्य केलं आहे.**



राशिद खान हा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वोत्तम फिरकी गोलंदाजांपैकी एक आहे. जगभरातील टी -२० लीग स्पर्धांमध्ये त्याच्या गोलंदाजीची जादू पाहायला मिळाली आहे. मात्र आयपीएलच्या गेल्या २ हंगामात त्याला आपली छाप सोडता आलेली नाही. गेल्या संपूर्ण हंगामात त्याला केवळ १० गडी बाद करता आले होते. तर या हंगामातील ८ सामन्यांमध्ये त्याला ६ गडी बाद करता आले आहेत. त्याची ही कामगिरी पाहता, अनेकांनी त्याला संघाबाहेर बसवण्याचा सल्ला दिला. मात्र आता साई सुदर्शनने स्पष्ट केलं आहे की, संघ त्याला पाठीशी घालणार आहे. संघातील खेळाडूंना त्याच्यावर विश्वास आहे.या सामन्यात शानदार अर्धशतकी खेळी करणाऱ्या साई सुदर्शनला राशिद खानबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी तो म्हणाला,“ तो जगातील सर्वोत्कृष्ट टी -२० गोलंदाजांपैकी एक आहे. आता तो पुन्हा एकदा विकेट घेण्याच्या मूडमध्ये परतला आहे. आम्हा सर्वांना त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे. कॉमेन्ट्री बॉक्समध्ये काय बोललं जातं याकडे आम्ही लक्ष देत नाही..” असं म्हणताच, निक नाईट म्हणाला, “आम्ही शंका नव्हतोच घेत, आम्हाला त्याची क्षमता माहिती आहे.संघाने दाखवलेला विश्वास आज राशिद खानने सार्थ ठरवला. राशिदने मोक्याच्या क्षणी २ महत्वपूर्ण गडी बाद केले. या डावात गोलंदाजी करताना त्याने आक्रमक सलामीवीर फलंदाज सुनील नरेनला अवघ्या १७ धावांवर तर विस्फोटक फलंदाज आंद्रे रसेलला २१ धावांवर माघारी धाडलं. हे दोघेही फलंदाज टिकले असते, तर सामना गुजरात टायटन्सच्या हातून निसटला असता.होम ग्राऊंडवर कोलकाता नाईट रायडर्स संघाला आणखी एका पराभवाचा सामना करावा लागला आहे. गतविजेता संघ या हंगामात संघर्ष करताना दिसून आला आहे. ईडन गार्डन्सवर पार पडलेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि गुजरात टायटन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात फलंदाजांनी केलेल्या दमदार कामगिरीनंतर गुजरातच्या गोलंदाजांचाही सुपर हिट शो पाहायला मिळाला. या शानदार कामगिरीच्या बळावर गुजरात टायटन्सने या सामन्यात ३९ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात गुजरात टायटन्स संघाला नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी मैदानात यावं लागलं. ईडन गार्डन्सवर सामना जिंकायचा म्हणजे, २०० धावा करणं खूप गरजेचं आहे. कारण है मैदान फार मोठं नाही आणि आऊटफिल्ड जरा जास्तच फास्ट आहे. त्यामुळे धावा करणं सोपं जातं. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या गुजरातसमोर पहिल्या डावात २०० धावांचा पल्ला गाठणं महत्वाचं होतं. गुजरातला पहिल्या डावात १९८ धावांपर्यंत मजल मारता आली.

### गुजरात एक्स्प्रेस सुसाट!

कोलकाता नाईट रायडर्सला हा सामना जिंकण्यासाठी १९९ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना कर्णधार अजिंक्य रहाणेची खेळी वगळली, तर इतर कुठलाही फलंदाज हवी तशी कामगिरी करू शकला नाही. अजिंक्य रहाणेने अर्धशतकी खेळी केली. सलामीला फलंदाजीला आलेला रहमानुल्लाह गुरबाज १ तर सुनील नरेन १७ धावा करत माघारी परतला. शेवटी रिंकू सिंगने जोर लावला, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय कुठेतरी फसला. कारण कोलकाता नाईट रायडर्सचे गोलंदाज विकेट्स घेण्यात अपयशी ठरले. गुजरात टायटन्स संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी कर्णधार शुबमन गिल आणि साई सुदर्शनची जोडी मैदानावर आली.

# डेव्हॉन कॉनवेच्या वडिलांचे निधन

## कॉनवेने सोशल मीडियावर वडिलांसोबतचा फोटो शेअर केला

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आयपीएल २०२५ स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात मुंबई इंडियन्सने शानदार कामगिरी करत ९ गडी राखून विजयाची नोंद केली. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज संघातील खेळाडू हातावर काळी पट्टी बांधून मैदानात उतरले होते. हे पाहताच क्रिकेट चाहत्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. नेमकं असं काय घडलं की, चेन्नईच्या खेळाडूंना काळी पट्टी बांधून मैदानावर उतरावं लागलं.**



आता चेन्नई सुपर किंग्ज फ्रेंचायझीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे.चेन्नई सुपर किंग्जकडून खेळणारा आक्रमक फलंदाज डेव्हॉन कॉनवे याच्या वडिलांचे निधन झाले आहे. त्यामुळे तो मुंबई इंडियन्सविरुद्ध झालेल्या सामन्यात खेळू शकला नव्हता. सामन्यानंतर समालोचन करत असलेल्या हर्षा भोगले यांनी देखील याबाबत माहिती दिली होती. ते सांत्वना देत म्हणाले की, डेव्हॉन कॉनवेला आता न्यूझीलंडला जावं लागेल. दरम्यान आज (२१ एप्रिल) चेन्नई सुपर किंग्जच्या सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट शेअर करून याबाबत अधिकृतरित्या माहिती देण्यात आली आहे. यासह त्यांनी डेव्हॉन कॉनवेचा आपल्या वडिलांसोबतचा फोटो शेअर केला आहे.डेव्हॉन कॉनवेच्या या हंगामातील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्याला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. ११ एप्रिलला तो चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी शेवटचा सामना खेळताना दिसून आला होता. या स्पर्धेत त्याला ३ सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्याला ९४ धावा करता आल्या आहेत. तसेच या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्जकडून रविंद्र जडेजाने सर्वाधिक ५३ धावांची खेळी केली. तर शिवम दुबेने ५० धावा केल्या. चेन्नईला २० षटकअखेर ५ गडी बाद १७६ धावा करता आल्या.या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मुंबई इंडियन्सकडून रोहित शर्माने सर्वाधिक ७६ धावांची खेळी केली. सूर्यकुमार यादवने देखील गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. त्याने रोहितला चांगली साथ दिली.

### हर्षा भोगले यांनी याबाबत माहिती दिली

या डावात त्याने २०० च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करत नाबाद ६८ धावांची खेळी केली. यासह मुंबईने हा सामना ९ गडी राखून आपल्या नावावर केला.११ एप्रिलला तो चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी शेवटचा सामना खेळताना दिसून आला होता. या स्पर्धेत त्याला ३ सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्याला ९४ धावा करता आल्या आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार ।
। दि. 22 एप्रिल 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## प्रियदर्शनी शाळेच्या सीमा फाटक यांना

# 'शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार' प्रदान!

### शिक्षण विश्व: ब्रेन वर्ल्ड ग्रुप आणि अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठातर्फे पुरस्कार प्रदान

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आळंदी येथील प्रियदर्शनी स्कूलच्या प्राचार्या सीमा फाटक यांना 'शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार २०२५' या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले.**

हा पुरस्कार ब्रेन वर्ल्ड ग्रुप आणि अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २० व्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषदेत प्रदान करण्यात आला.

सीमा फाटक यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, अखंड निष्ठा आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम यांची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. या परिषदेमध्ये देशभरातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत एकत्र आले होते, ज्यांनी प्रियदर्शनी शाळेच्या सर्वांगीण व कौशल्याधिष्ठित शिक्षणपद्धतीचा गौरव केला.

> बालकांचे भावी आयुष्य घडवण्यासाठी सातत्याने प्रियदर्शनी शाळा प्रयत्नशील आहे. आमच्या शाळेतील प्रत्येक शिक्षक हा प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये समाजाचा जबाबदार नागरिक घडवण्याचा प्रयत्न करत आहे. शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार २०२५' शिक्षिका सीमा फाटक यांचे कार्य प्रेरणादायी असून, त्यांचा प्रवास इतरांना मार्गदर्शक ठरणार आहे
> **–सरिता सिंग,** मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी स्कूल, आळंदी




## महिला पोलीस अधिकाऱ्याला खो-खो स्पर्धेत सुवर्ण आणि कांस्य पदक

### महाराष्ट्र पोलीस संघाचे प्रतिनिधित्व; पोलीस आयुक्तांकडून सन्मान

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाकड पोलीस स्टेशनच्या महिला उपनिरीक्षक प्रियांका करांडे यांनी खो-खो स्पर्धेत सुवर्ण व कांस्य पदक पटकावले आहे.**

प्रियांका करांडे या २२ ते २५ फेब्रुवारी दरम्यान ठाणे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. यामध्ये त्यांनी खो-खो स्पर्धेत कांस्य पदक मिळवले. त्यानंतर २ ते ६ मार्च २०२५ दरम्यान जालंधर (पंजाब) येथे पार पडलेल्या ऑल इंडिया कॅम्बेट क्लस्टर पोलीस क्रीडा स्पर्धेत त्यांनी खो-खो प्रकारात सुवर्ण पदक पटकावले.

तसेच ३१ मार्च ते ४ एप्रिल दरम्यान पुरी (ओडिशा) येथे झालेल्या ५७ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस संघाचे प्रतिनिधित्व करून यश मिळवले. या यशाबद्दल पोलीस आयुक्त विनायक चौबे, अपर आयुक्त वसंत परदेशी आणि पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे आणि स्वप्ना गोरे यांनी त्यांचे अभिनंदन केले.



ADMISSION OPEN

From 21st April 2025

1 Hour /day

Monday to Saturday

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch

प्रज्ज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

## Our Courses



- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- 'C ++' Language
- Basic Java
- Basic Tally
- M. S. Office

Contact: 8087706100/ Computer Lab

Registration started

Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com